"स्वावलंबी शिक्षण हे आमचे ब्रीद" - कर्मवीर

रयत शिक्षण संस्थेचे



# कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा

ता. माढा, जि. सोलापूर, पिन कोड – ४१३२०९ (महाराष्ट्र, भारत)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर संलग्न

(सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार: २०२१)

NAAC मान्यताप्राप्त: 'A+' CGPA- 3.26, Web-www.accmadha.com, ई-मेल: accmadha@yahoo.com

हिंदी व मराठी विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आयोजित

राष्ट्रीय परिषद

## 'हिंदी आणि मराठी साहित्यातील मानवी मूल्ये'

दिनांक: सोमवार, ०७ ऑक्टोबर, २०२४

**महोदय,**

कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा येथे सोमवार, ०७ ऑक्टोबर, २०२४ रोजी आयोजित 'हिंदी आणि मराठी साहित्यातील मानवी मूल्ये' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेसाठी आम्ही तुम्हाला हार्दिक आमंत्रित करतो.

### रयत शिक्षण संस्थेबद्दल:

रयत शिक्षण संस्था ही आशिया खंडातील अग्रगण्य शैक्षणिक संस्थांपैकी एक आहे. रयत शिक्षण संस्था ही राष्ट्रीय व जागतिक स्तरावरही दूरदूरपर्यंत नावाजलेली आणि सन्मानित असलेली अग्रेसर शिक्षण संस्था आहे. संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील आणि त्यांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई पाटील यांनी एका उदात्त ध्येयाने संस्था सुरु केली. कर्मवीरांचे शिक्षणातील योगदान खूप मोठे आहे. कारण त्यांनी सुरुवातीपासूनच समाजातील उपेक्षित, गरीब आणि अज्ञानी यांच्या शिक्षणावर भर देण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला आहे. डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील हे शिक्षणासाठी सर्व तन-मन-धन झोकून देणारे शिक्षण महर्षी होते. त्यांना त्यांच्या काळातील सामाजिक प्रश्नांची तीव्र जाणीव होती. यामुळे शिक्षणाच्या प्रसाराची नितांत गरज त्यांनी पूर्णपणे जाणली. शिक्षणानेच जातीभेद, सावकारी, निरक्षरता, अस्पृश्यता, अंधश्रद्धा आणि सामाजिक व आर्थिक विषमता यांसारख्या सामाजिक विकृती दूर होऊ शकतात. यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केला. ते मानवतावादी होते. लोकांच्या दुःख आणि अज्ञानाच्या जीवनात आशेचा प्रकाश आणण्यासाठी व त्यांना शिक्षित करण्यासाठी कठोर परिश्रम कर्मवीरांनी घेतले. यासाठी १९१९ मध्ये काले (ता. कराड, जि. सातारा) येथे बोर्डिंग हाऊस सुरू करून रयत शिक्षण संस्थेचा पाया घातला. मात्र, लवकरच १९२४ मध्ये त्यांनी आपल्या शैक्षणिक संस्थेचे मुख्यालय सातारा येथे हलवले. आज या संस्थेची महाराष्ट्रात ४१ महाविद्यालये, ४३९ हायस्कुले, कॉलेजच्या मुलांसाठी २७ वसतीगृहे, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, १७ शेती महाविद्यालये, ५ तंत्र विद्यालये, ५ इंग्रजी माध्यमाच्या शाळा, ४५ प्राथमिक व पूर्व प्राथमिक शाळा, शाळेच्या मुलांसाठी ६८ वसतिगृहे, ८ आश्रमशाळा, ५८ आयटीआय व इतर एकूण संस्था ६७९, एकूण विद्यार्थी सुमारे साडेचार लाख व सेवक १६,९४८ आहेत.

### महाविद्यालयाबद्दल:

जून १९७० मध्ये "गुणवत्तापूर्ण शिक्षणाद्वारे ग्रामीण युवा सक्षमीकरण" या सुस्पष्ट हेतूने महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. माढा या दुष्काळग्रस्त शहरातील आमचे एकमेव महाविद्यालय आहे. आजूबाजूच्या गावांना आणि स्थानिक

समुदायाला स्वाभाविकपणे त्यांच्या येणाऱ्या पिढ्यांना उच्च शिक्षण देण्यासाठी महाविद्यालयाची गरज भासू लागली. त्यामुळे महाविद्यालयास सोळा एकर जमीन संस्थेच्या स्थानिक हितचिंतकांनी उदार हस्ते दान दिली. विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये रुजवणे आणि नवीन आव्हाने स्वीकारण्यास सक्षम बनवणे; हे महाविद्यालयाचे उद्दिष्ट आहे. महाविद्यालय शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात उत्तम कामगिरी करत आहे. गेल्या पाच वर्षात, NAAC द्वारे दुसऱ्या सायकलच्या पुनर्मान्यतेनंतर, महाविद्यालयाने अध्यापन, अध्ययन, संशोधन, विस्तार उपक्रम आणि विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता यामध्ये उत्कृष्टता निर्माण करण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले आहेत. पारंपारिक अभ्यासक्रमांसोबतच कौशल्य विकासाचे अभ्यासक्रम उपलब्ध केले आहेत. NAAC च्या तिसऱ्या सायकलमध्ये, आमच्या महाविद्यालयाने 3.26 CGPA सह 'A+' ग्रेड मिळवला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर कडून या महाविद्यालयाला “बेस्ट कॉलेज अवॉर्ड”-२०२१ ने सन्मानित करण्यात आले आहे. तसेच PM-USHA अंतर्गत पाच कोटी रुपयांचे आर्थिक अनुदान प्राप्त झाले आहे.

## मराठी व हिंदी विभागांबद्दल:

मराठी आणि हिंदी विभागाची स्थापना १९७० मध्ये झाली. हा विभाग बॅचलर पदवी अभ्यासक्रम चालवतो. नजीकच्या भविष्यात पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्याची योजना आखली आहे. मराठी व हिंदी विभाग सहकार्याने विद्यार्थ्यांमध्ये प्रादेशिक, राष्ट्रीय भाषांमधील ज्ञान पुरवितात. तसेच भाषिक कौशल्य विकसित करतात. विद्यार्थ्यांची कौशल्ये आणि रोजगारक्षमता निर्माण करण्यासाठी अल्पकालीन डिप्लोमा आणि मूल्यवर्धित अभ्यासक्रम देखील पुरवितात. सामाजिक कार्यक्रम आणि अभ्यासक्रमेत्तर कार्यक्रमही वेळोवेळी आयोजित केले जातात. विभागाचे प्राध्यापक त्यांच्या संबंधित क्षेत्रात चांगले अनुभवी असून; ते राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील संशोधन कार्यात नेहमी अग्रेसर राहतात.

## परिषदेबद्दल:

कला आणि वाणिज्य महाविद्यालय, माढाच्या मराठी आणि हिंदी विभागातर्फे सोमवार, ०७ ऑक्टोबर, २०२४ रोजी 'हिंदी आणि मराठी साहित्यातील मानवी मूल्ये' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. हे महाविद्यालय दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानदानाचे काम करीत आहे. या परिषदेमधून विद्यार्थी, संशोधक, शिक्षक, विद्वान आणि मराठी आणि हिंदीमधील अभ्यासकांचे मानवी मूल्ये आणि भाषा, साहित्य यांविषयी सजगता वाढेल. तसेच दैनंदिन जीवनात मानवी मूल्यांच्या महत्त्वाबाबत अनेक पैलूंवर चर्चा केली जाणार आहे. हीच आजच्या परिस्थितीची खरी गरज आहे. यातून मूल्याधारित समाजाची निर्मिती शक्य आहे. यादृष्टीने परिषदेचे महत्त्व वाढते.

## राष्ट्रीय परिषदेचा विषय आणि उपविषय:

| मराठी साहित्यातील मानवी मूल्ये | हिंदी साहित्य मे मानवी मूल्य |
|---|---|
| १. मराठी साहित्य, भाषा यांमधील मानवी मूल्ये | १. हिंदी साहित्य और भाषा में मानवी मूल्य |
| २. भाषाशास्त्र व समीक्षा यांमधील मानवी मूल्ये | २. भाषाविज्ञान और आलोचना में मानवी मूल्य |
| ३. वंचितांच्या साहित्यामधील मानवी मूल्यांचे दर्शन | ३. आदिवासी साहित्य में मानवी मूल्यों का चित्रण |
| ४. सामाजिक, राजकीय व आर्थिक विचारांतील मानवी मूल्य | ४. सामाजिक, राजकीय और आर्थिक विचारों में मानवी मूल्य |
| ५. स्त्रीवाद व मूल्यव्यवस्था | ५. स्त्रीवाद और मूल्य व्यवस्था |
| ६. मराठी साहित्यामधील पर्यावरणीय मूल्यांचे चित्रण | ६. हिंदी साहित्य मे प्राकृतिक मूल्यों का चित्रण |
| ७. विज्ञान व तंत्रज्ञान साहित्यामधील मानवी मूल्य चित्रण | ७. विज्ञान एवं तंत्रज्ञान साहित्य में मानवी मूल्य |
| ८. लोकसाहित्यामधील मानवी मूल्ये | ८. लोकसाहित्य में मानवी मूल्य |
| ९. साहित्यामधील वैश्विक मूल्यांचे दर्शन | ९. साहित्य में वैश्विक मूल्यों का चित्रण |
| १०. साहित्यातील व्यावसायिक मूल्ये आणि तत्वे | १०. साहित्य में व्यावसायिक मूल्यों का चित्रण |

| | |
|---|---|
| ११. साहित्यातील बहु -सांस्कृतिक मूल्यांचे दर्शन<br>१२. साहित्यातील शैक्षणिक मूल्य दर्शन<br>१३. विधी साहित्यातील न्यायिक मानवी मूल्ये | ११. साहित्य में सांस्कृतिक मूल्य<br>१२. साहित्य में शैक्षिक मूल्य और तत्व<br>१३. विधि साहित्य में न्यायिक मानवी मूल्य |

(टीप: मुख्य विषयाशी संबंधित इतर कोणताही विषय निवडता येईल.)

## Call for Research Papers:

The abstract and full length papers should be sent by e-mail on or before *05th October, 2024*. Participants can present their research papers offline mode. The research paper should by typed in following methods:

1. MARATHI/HINDI: Unicode font Mangal, Font size 14 & Kokila font size 16.
2. A4 size paper spacing 1.5 on within the prescribed margin. The paper should not exceed more than 2000 words.
3. A soft copy (PDF & Word file) should be mailed at the following e-mails:
   Marathi: accmarathi@gmail.com Hindi: acchindi2024@gmail.com

## Registration Fee:

### For MARATHI:

Single Author with Paper Publication : 3000/-
Double Author with Paper Publication : 4500/-
Research Scholar with Paper Publication : 3000/-
Without Paper/Only Registration : 500/-
(IMP NOTE: Research Papers of the participants will be published in **UGC CARE Listed Journal**.)

### For HINDI:

Single Author with Paper Publication : 1000/-
Double Author with Paper Publication : 1500/-
Research Scholar with Paper Publication : 1000/-
Without Paper/Only Registration : 500/-
(IMP NOTE: Research Papers of the participants will be published in Peer Reviewed Journal.)

## Bank Details for Transaction of Registration Fees:

Bank Name: Bank of India, Branch : Madha, Dist. Solapur
Account Holder Name : Pracharya, Arts and Commerce College, Madha
Account Number : **072410110011044**
IFSC : BKID0000724
(After Payment of the fee please submit the screen shot on the group.)

**Registration and WhatsApp Group Link: https://forms.gle/Eo336wHipR337H4n9**

## मार्गदर्शक

माननीय श्री. शरदचंद्रजी पवार
अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा

श्री. चंद्रकांत दळवी (आयएएस, सेवानिवृत्त)
चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा

ॲड. भगीरथ शिंदे
व्हाईस चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा

डॉ. अनिल पाटील
संघटक, रयत शिक्षण संस्था, सातारा

श्री. विकास देशमुख (आयएएस, सेवानिवृत्त)
सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा

प्रि. डॉ. शिवलिंग मेनकुदळे
सहसचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा

प्रि. डॉ राजेंद्र मोरे
ऑडिटर, रयत शिक्षण संस्था, सातारा

श्री. संजीव पाटील
चेअरमन, मध्य विभाग
रयत शिक्षण संस्था, सातारा

डॉ.सदाशिव कदम
सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल
रयत शिक्षण संस्था, सातारा

ॲड.बाळासाहेब पाटील
सदस्य, महाविद्यालय विकास समिती

ॲड. मीनलताई साठे
सदस्य, महाविद्यालय विकास समिती

डॉ. सुनील हेळकर
प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा

## आयोजन समिती

| | | |
|---|---|---|
| **डॉ. एस.पी. पैकेकरी**<br>मराठी विभागप्रमुख | **डॉ. अलका घोडके**<br>हिंदी विभागप्रमुख | **डॉ. एन.व्ही. शिंदे**<br>समन्वयक, IQAC |
| **प्रा. ए.व्ही. कदम**<br>उपप्राचार्य | **प्रा.सी.एच. गिड्डे**<br>कोषाध्यक्ष | **प्रा.डी.बी. बोडरे**<br>समन्वयक |

## कार्यवाह समिती

| | | |
|---|---|---|
| डॉ.पी.जी. गायकवाड | प्रा.ए.बी. लोंढे | डॉ.जे.एम.पालकर |
| डॉ.आर.जी. दिकोंडा | प्रा.डी.एस.मांजरे | श्रीमती एम.बी. कुंभार<br>ग्रंथपाल |
| डॉ.पी.यु. ढमाळ | श्री.एच.जी. खपाले<br>कार्यालयीन प्रतिनिधी | |


**संपर्क:**

**मराठी**

**डॉ. एस.पी. पैकेकरी** (9822470903)
**डॉ. एन.व्ही. शिंदे** (9850125584)

**हिंदी**

**डॉ.ए.डी. घोडके** (9075844083)
**प्रा. सी.एच. गिड्डे** (8975077910)
**प्रा. डी.बी. बोडरे** (8468879630)